स्मरणपत्र
गोपनीय/तात्काळ

क्रमांक पीआरओ-१९०५/प्र.क्र-३९६/विशा-२,
गृह विभाग (विशेष), मंत्रालय, मुंबई-३२.
दिनांक :- २९ ऑगस्ट, २००८.

प्रति,

महासंचालक व पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
अपर पोलीस महासंचालक, गुन्हा अन्वेषण विभाग (गुन्हे), महाराष्ट्र राज्य, पुणे.
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व जिल्हा दंडाधिकारी,
सर्व पोलीस आयुक्त ( लोहमार्गासह),
सर्व पोलीस अधिक्षक ( लोहमार्गासह),
सर्व सहाय्यक संचालक व जिल्हा सरकारी अभियोक्ता.

विषय :- खटले मागे घेण्याबाबत
महिलांवर दारुबंदी संदर्भात आंदोलन करतेवेळी
दाखल करण्यात आलेल्या गुन्ह्यातील खटले.

संदर्भ :- शासन परिपत्रक क्रमांक गृह विभाग(विशेष),
क्रमांक पीआरओ-१९०५/प्र.क्र-३९६/विशा-२,
दिनांक १५/०९/२००६ कृपया पहावे.

उपरोक्त विषयाबाबत आपणास असे कळविण्यात येते की, मा.उपमुख्यमंत्री महोदयांनी महाराष्ट्र विधानसभा सन २००७ च्या तिसऱ्या (दिवाळी) अधिवेशनात "दारुच्या विरोधात महिलांच्या झालेल्या आंदोलनातील महिलांवरील गुन्हे परत घेण्याच्या दृष्टीने शिफारस करण्याची भूमिका घेतली जाईल. ज्यांच्यावर असे गुन्हे नोंदले गेले आहेत त्यांनी लवकरात लवकर ॲप्लिकेशन्स द्यावीत." असे आश्वासन दिले आहे.

तरी उपरोक्त संदर्भाधिन परिपत्रकानुसार अशा प्रकरणी संबंधित खटले मागे घेण्याबाबत आवश्यक कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात आल्या होत्या. तथापि काही ठिकाणी अद्याप खटले मागे घेण्यात आले नसल्याचे उपरोक्त आश्वासनावरुन शासनाच्या निदर्शनास आले आहे. तरी या प्रकरणी विधी मंडळात दिलेल्या आश्वासनाचे गांभीर्य लक्षात घेवून शासनाच्या दि.१५/०९/२००६ च्या परिपत्रकातील सूचना विचारात घेऊन दारुबंदी संदर्भात आंदोलन करतेवेळी महिलावर दाखल झालेले गुन्हे मागे घेण्यासंदर्भात कार्यवाही करुन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल शासनास त्वरीत सादर करावा.

सही/-
( स. अ. जयवंत )
उप सचिव, महाराष्ट्र शासन, गृह विभाग (विशेष)

गोपनीय

**खटले मागे घेणेबाबत**
महिलांवर दारुबंदी संदर्भात आंदोलन करतेवेळी दाखल करण्यात आलेल्या गुन्ह्यांतील खटले.

**महाराष्ट्र शासन**
**गृह विभाग**
शासन परिपत्रक, गृह विभाग (विशेष), क्रमांक : पीआरओ-११०५/प्र.क्र-३९६/विशा-२.
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२, दिनांक : १५ सप्टेंबर २००६.

<u>प्रस्तावना</u> :- दारुमुळे सामाजिक दुष्परिणाम होतात. दारु विक्री बंद करण्यासाठी कडक निर्बंध असणे आवश्यक आहे. दारुचा सगळ्यात जास्त त्रास महिलांना होतो. त्यामुळे अवैध दारुचे धंदे तसेच काही वैध दारुची दुकाने बंद करण्यासाठी विविध सामाजिक, राजकीय व महिला संघटनांमार्फत महिलांकडून आंदोलने केली जातात. अशा स्वरुपाच्या दारुबंदी संदर्भात महिलांनी केलेल्या आंदोलनातील खटले मागे घेण्याबाबत विचार करण्यासाठी यापूर्वी राज्यातील सर्व पोलीस आयुक्त व सर्व जिल्हादंडाधिकारी यांच्याकडून अहवाल मागविण्यात आलेले होते. त्यांचेकडून प्राप्त झालेल्या अहवालांस अनुसरुन खटल्यांतील गुन्ह्यांचे गांभीर्य विचारात घेऊन गुणवत्तेनुसार खटले मागे घेण्याबाबत शासनाने शिफारस केलेली आहे.

तथापि, अजूनही अशा प्रकारच्या आंदोलनांतील खटले न्यायालयात प्रलंबित आहेत असे शासनाच्या निदर्शनास आले आहे. दारुबंदी आंदोलनात सहभागी झालेल्या बहुतेक महिलांची पार्श्वभूमी गुन्हेगारी स्वरुपाची नसून त्यांचा हेतू केवळ अवैध दारुचे धंदे, काही वैध दारुची दुकाने बंद करणे व त्याबाबत ठोस पावले उचलण्यासाठी शासनाचे लक्ष वेधणे इतकाच आहे. त्यापैकी अनेक आंदोलनामध्ये कोणतीही जिवित तथा वित्त हानी झालेली नाही. तरी काही आंदोलनात किरकोळ स्वरुपाची वित्त हानी/ किरकोळ स्वरुपाच्या दुखापती झालेल्या आहेत. मात्र सदर महिला आंदोलकांवर नोंदविलेल्या गुन्ह्यांतर्गत दाखल असलेले खटले न्यायालयात वर्षानुवर्ष चालू असल्यामुळे सुनावणीसाठी वेळोवेळी उपस्थित राहण्यास महिलांना त्रासदायक होते. तसेच प्रलंबित खटले न्यायालयात यशस्वी करण्याकरिता शासकीय यंत्रणेचा विशेषत: पोलीस यंत्रणेचा वेळ व शक्ती खर्ची पडते. तसेच अशा खटल्यांचा पाठपुरावा केल्याने फारसे जनहित साध्य होण्यासारखे नाही.

**शासन परिपत्रक :-** सबब, उपरोक्त नमूद बाबींचा सर्वंकष विचार करुन सर्व जिल्हादंडाधिकारी, सर्व पोलीस आयुक्त यांना शासन अशा सूचना देत आहे की, फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ च्या कलम ३२१ खालील तरतुदीनुसार शासनातर्फे सरकारी अभियोक्ता यांना दारुबंदी संदर्भात महिलांनी केलेल्या आंदोलनाच्या संदर्भात राज्यातील विविध पोलीस ठाण्यांमध्ये महिलांविरुध्द नोंदविलेल्या गुन्ह्यांतर्गत भरण्यात आलेले सर्व फौजदारी खटले **( ज्या आंदोलनामध्ये आंदोलक/ शासकीय कर्मचाऱ्यांचा मृत्यु झालेला आहे, अथवा रुपये पाच लाख व त्यापेक्षा जास्त रक्कमेचे शासकीय/ खाजगी संपत्तीचे नुकसान झालेले आहे, अशी प्रकरणे वगळून)** मागे घेण्याबाबत आवश्यक ती कार्यवाही करण्याची शिफारस करण्यात यावी. याबाबत विधी व न्याय विभागाने त्यांचे परिपत्रक क्र. १४७५/गुप्त-अ, दिनांक १५ नोव्हेंबर, १९६६ अन्वये निर्गमित केलेल्या सुचनांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे.

वरीलप्रमाणे कार्यवाही करण्यापूर्वी सदर गुन्ह्यांच्या संदर्भात ईतर कोणत्याही न्यायालय अथवा न्यायाधिकरणात अथवा आयोगापुढे दावा प्रलंबित नसल्याची प्रथमतः पडताळणी करण्यात यावी व या प्रकरणी करण्यात आलेल्या कार्यवाहीचा अनुपालन अहवाल शासनास १५ दिवसांत पाठवावा.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

( अ. नं. नाईकनवरे )
उप सचिव, महाराष्ट्र शासन, गृह विभाग (विशेष )

प्रति,

महासंचालक व पोलीस महानिरीक्षक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
अपर पोलीस महासंचालक, गुन्हा अन्वेषण विभाग ( गुन्हे), महाराष्ट्र राज्य, पुणे.
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व जिल्हादंडाधिकारी.
सर्व पोलीस आयुक्त ( लोहमार्गासह)
सर्व पोलीस अधिक्षक ( लोहमार्गासह ),
सर्व सहाय्यक संचालक व जिल्हा सरकारी अभियोक्ता,
विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई.
निवड नस्ती ( कार्यासन - विशा-२).

D/VIJAYA/SPL-२ VIJAYA/NOTE/OCTOBER/०४.lwp